# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे-२०२३/५९/८९५
दूरध्वनी: ०२२-२६६७७५५५
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : ०२ जून,२०२३.

**प्रति,**
मा.आयुक्त, सर्व महानगरपालिका,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापकिय संचालक, नियोजन प्राधिकरणे व विशेष नियोजन प्राधिकरणे,
शासकीय अग्निशमन सेवांचे प्रमुख,
मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा/नगर पंचायती.

प्रमुख अग्निशमन अधिकारी/प्रभारी अग्निशमन अधिकारी,
सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/नगर पंचायती/ नियोजन प्राधिकरणे व विशेष नियोजन प्राधिकरणे.

विषय : महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम,२०२३ ची अंमलबजावणी करण्याबाबत.

संदर्भ : १.शासन अधिसुचना सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२४, दि.११ मे,२०२३
२.शासन अधिसुचना क्र.असशे-२०२२/प्र.क्र.३६, नवि-१४, दि.३० मे,२०२३.
३.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचे आदेश क्र.का.१५/वामूदत-२०२२-२३/३६१, दिनांक ३१ मार्च,२०२२.

***महोदय,***

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शासनाने, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ (२००७ चा महा.३) या कायदयामध्ये सुधारणा केली असून वरील संदर्भ क्र.१ नुसार **महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम,२०२३** निर्गमित केलेले आहेत. तसेच वरील संदर्भ क्र.२ अन्वये सदर अधिनियमाचा अंमलबजावणीचा दिनांक ३० मे,२०२३ हा दिवस निश्चित केलेला आहे. संदर्भाकिंत दोन्ही शासन अधिनियम www.mahafireservice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

०२. अग्निशमन कायदयाच्या कलम ११ अन्वये जमा करण्यात येणा-या आग सुरक्षा निधी मध्ये सुधारणा करण्यात आलेली असून सुधारित अधिनियम,२०२३ च्या अनुसूची-दोन **अग्निशमन व आपत्कालिन सेवा फि संरचना** विहित तक्त्यामध्ये देण्यात आलेली आहे. अग्निशमन व आपत्कालिन सेवा फि आकारण्याकरीता वरील संदर्भ क्र.३ अन्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी निश्चित केलेल्या विवरणपत्रातील बांधकामाच्या वार्षिक मूल्य दराच्या (एएसआर) अनुसूची-दोन मध्ये दर्शविलेल्या टक्केवारीनुसार अग्निशमन व आपत्कालिन सेवा फिची परिगणना करावयाची असून सदर फि दिनांक ३० मे,२०२३ पासून सर्व अग्निशमन सेवांनी लागू करावयाचे आहेत.

.....२/-

०३. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निश्चित केलेल्या बांधकामाचे वार्षिक मूल्य दर बृहन्मुंबई (मुंबई शहर व उपनगर जिल्हयातील) महानगरपालिका क्षेत्र आणि महाराष्ट्रातील बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून उर्वरित क्षेत्रातील जिल्हानिहाय बांधकामाचे वार्षिक मूल्य दराबाबत (एएसआर) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्र.का.१५/वामूदत-२०२२-२३/३६१, दिनांक ३१ मार्च,२०२२ परिशिष्टासह सोबत जोडण्यात आलेले आहेत. बांधकामाचे वार्षिक मूल्य नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी सुधारणा केलेल्या दरानुसार सुधारित अग्निशमन अधिनियमाच्या अनुसूची-दोन मध्ये दिलेल्या टक्केवारीनुसार **अग्निशमन व आपत्कालिन सेवा फि दिनांक ३० मे,२०२३ पासून आकारणी करण्यात यावी.**

०४. बांधकामाच्या वार्षिक मूल्य दरानुसार फि आकारणी करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

आपला विश्वासू,

वारीक 02/06/23.

**(एस.एस.वारीक)**
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

प्रत : माहितीसाठी सविनय सादर.

१. मा.प्रधान सचिव-१, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. मा.प्रधान सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
३. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-४०००३०.
४. उप सचिव, नगर विकास विभाग (नवि-१४), मंत्रालय, मुंबई-४०००३२.

## अनुसूची - दोन

(कलम ११ पहा)

## अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी संरचना

**१.** अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी , खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, (१९५८ चा ६०) या अन्वये तयार केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तविक बाजार मूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ याच्या तरतुदींअन्वये प्रसिद्ध केलेल्या वार्षिक दर विवरणपत्राच्या (एएसआर) टक्केवारी अनुसार इमारतीच्या विविध प्रवर्गांसाठी बांधीव क्षेत्राच्या प्रति चौरस मीटरप्रमाणे आकारण्यात येईल :—

**तक्ता**

| अ.क्र. | इमारतीची उंची मीटरमध्ये | वार्षिक दर विवरणपत्राच्या टक्केवारीनुसार (एएसआर) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | निवासी | संस्थेची इमारत | वाणिज्यिक | औद्योगिक |
| १ | ४५ मी. पर्यंतची इमारत | ०.२५% | ०.५०% | ०.७५% | ०.७५% |
| २ | ४५ मी. पेक्षा उंच इमारत | ०.५०% | ०.७५% | १.००% | १.००% |

**२.** वरील परिच्छेद १ मधील भोगवट्यांचे वर्गीकरण, अग्निशमन व जीवसंरक्षण याबाबतीत भारतीय राष्ट्रीय इमारत संहितेच्या भाग ४ मध्ये वर्गीकृत केल्याप्रमाणे असेल, जे पुढीलप्रमाणे आहे :—

(क) " **निवासी इमारत** " याचा अर्थ, उक्त संहितेच्या उप-गट क-५ व क-६ खेरीज, त्याच्या भाग ४ च्या गट क मध्ये नमूद केलेले निवासी भोगवटे, जसे की, निवासगृह (लॉजिंग), भोजनगृह (बोर्डिंग), शयनगृह (डॉर्मेटरी), वेश्म (अपार्टमेंट) व बहुस्तरीय मोटार वाहनतळ (मल्टी लेव्हल कार पार्किंग) व स्वयंचलित यांत्रिक मोटार वाहनतळ (मॅकेनाइज्ड पार्किंग), इत्यादी असा आहे.

(ख) " **संस्थेची इमारत**" याचा अर्थ, उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट ख मध्ये नमूद केलेले शैक्षणिक भोगवटे आणि उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट ग मधील संस्थात्मक भोगवटे, जसे की, शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ, रुग्णालय, शूश्रुषा गृह, इत्यादी, असा आहे.

(ग) " **वाणिज्यिक इमारत**" याचा अर्थ, उक्त संहितेच्या भाग ४ च्या उप-गट क-५ व क-६ मध्ये नमूद केलेले भोगवटे आणि उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट घ मधील सभागृह भोगवटे, उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट ङ मधील व्यवसाय भोगवटे आणि उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट च मधील व्यापारी भोगवटे, जसे की, हॉटेल, खानपान गृहे, मॉल, मल्टिप्लेक्स (बहुपडदा चित्रपटगृह), नाट्यगृह (थिएटर), दुकाने, इत्यादी असा आहे.

(घ) " **औद्योगिक इमारत** " याचा अर्थ, उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट छ मध्ये नमूद केलेले औद्योगिक भोगवटे, उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट ज मधील साठवण भोगवटे (बहुस्तरीय मोटार वाहनतळाखेरीज) आणि उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट झ मधील धोकादायक भोगवटे, असा आहे.

**टिपा.—इमारतीच्या वरील वर्गीकरणानुसार खालीलप्रमाणे फी ची परिगणना करण्यात येईल:—**

१. वार्षिक दर विवरणपत्राच्या आवश्यक टक्केवारीची परिगणना केल्यानंतर, आवश्यक मान्यतेसाठी विचाराधीन असलेल्या इमारतीच्या बांधीव क्षेत्राने, फी ला गुणण्यात येईल.

२. फी निर्धारित करण्याच्या प्रयोजनांकरिता (बांधीव क्षेत्र) हे, स्थूल बांधीव क्षेत्र असेल त्यात वास्तुशास्त्रज्ञाने प्रमाणित केलेल्या आणि इमारतीच्या बांधकामाच्या परवानगीसाठी केलेल्या अर्जासह प्राधिकरणाकडे सादर केलेल्या इमारतीच्या आराखड्यामध्ये दाखविल्याप्रमाणे, तळ मजला, सुविधाधिकार क्षेत्र, पादयष्टी (स्टिल्ट), पोडीयम, जिना, उद्‌वाहने, ओटा (लॉबी), व्हरांडा (पॅसेज), सज्जा (बाल्कनी), कमानीचा भाग (कॅन्टीलिव्हर पोर्शन), सेवा मजला, आश्रय क्षेत्रे (रेफुजी), इत्यादी यांचा समावेश होतो. या प्रयोजनाकरिता बांधीव क्षेत्राची परिगणना करताना त्याचा चटई क्षेत्र निर्देशांकाशी किंवा अन्य कोणत्याही रीतीने परिगणना केलेल्या बांधीव क्षेत्राशी कोणताही संबंध असणार नाही.

३. परिगणना करावयाची फी, इमारतीच्या सर्वात खालच्या स्तरापासून ते इमारतीच्या राहण्यायोग्य असलेल्या शेवटच्या मजल्यापर्यंत आकारण्यात येईल. मात्र तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे इमारतीची उंची निर्धारित करताना फीची स्लॅबनिहाय परिगणना करण्यात येणार नाही.

४. फीचे निर्धारण करण्याच्या प्रयोजनार्थ, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तविक बाजार मूल्य निर्धारण करणे) नियम, १९९५ याच्या तरतुदीअन्वये प्रसिद्ध केलेले वार्षिक दर विवरणपत्रातील दर हे महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने निर्गमित केलेले इमारत बांधकाम दर असतील.

५. भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता, भाग ४ नुसार १५ मीटर खालील भोगवट्याच्या उप-गट क-२ व क-४ म्हणून निश्चित केलेल्या इमारतीकरिता आणि या अधिनियमाच्या कलम १५ मध्ये असलेल्या सर्व इमारतींकरिता कोणतीही फी आकारली जाणार नाही.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

## SCHEDULE II

(*See* section 11)

Fire and Emergency Service Fee Structure

1. The Fire and Emergency Service Fee shall be levied as indicated in TABLE given below as per square meter of the built up area for the various categories of the building in accordance to percentage of the Annual Statements of Rates (ASR) as published under the provisions of the Maharashtra Stamp (Determination of True Market Value of Property) Rules, 1995 made under the Maharashtra Stamp Act (LX of 1958).

**TABLE**

| Sr. No. | Height of the Building in meters | Percentage of the Annual Statement of Rates (ASR) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Residential | Institutional | Commercial | Industrial |
| 1 | Building upto 45 m | 0.25% | 0.50% | 0.75% | 0.75% |
| 2 | Building above 45m | 0.50% | 0.75% | 1.00% | 1.00% |

2. The categorization of the occupancies in paragraph 1 above shall be as categorized in Part 4 of the National Building Code of India, regarding Fire and Life Safety, which are as follows :—

*(a)* "**Residential Building**" means Residential Occupancies as mentioned in Group A of Part 4 of the said Code except Sub-Groups A-5 and A-6 thereof, *viz.* Lodging, Boarding, Dormitories, Apartment, Multi-level car parking and Mechanized Automated Car Parking.

*(b)* "**Institutional Building**" means Educational Occupancies as mentioned in Group B of Part 4 of the said Code and Institutional Occupancies in Group C of Part 4 of the said Code, *viz.* School, College, University, Hospital, Nursing Home, etc.

*(c)* "**Commercial Building**" means Occupancies as mentioned in Sub-Groups A-5 and A-6 of Part 4 of the said Code and Assembly Occupancies in Group D of Part 4 of the said Code, Business Occupancies in Group E of Part 4 of the said Code and Mercantile Occupancies in Group F of Part 4 of the said Code, *viz.* Hotels, Eateries, Malls, Multiplex, Theatres, Shops, etc.

*(d)* "**Industrial Building**" means Industrial Occupancies as mentioned in Group G of Part 4 of the said Code, Storage Occupancies in Group H of Part 4 of the said Code (excluding Multi-level car parking) and Hazardous Occupancies in Group J of Part 4 of the said Code.

*Notes* :—The fee for the above classification of the building shall be calculated as under :—

1. The fee after computing the necessary percentage of the ASR shall be multiplied by the built up area of the building under consideration for necessary approval.

2. For the purposes of assessment of fee, the built-up area shall be gross built-up area, which includes area of basement, easements, stilts, podium, staircases, lifts, lobbies, passages, balconies, cantilever portions, service floors, refuge areas, etc., as shown in the building plan certified by the Architect and submitted to the Authority alongwith the application for permission for construction of a building. The built-up area to be calculated for this purpose will have no relation with the floor space index or the built-up area calculated in any other manner.

3. The fees to be calculated shall be taken from lowest level to the last livable floors and not slab-wise while determining height of the building as indicated in TABLE.

4. For the purposes of assessment of fee, the Annual Statement of Rates published under the provisions of the Bombay Stamp (Determination of True Market Value of Property) Rules, 1995 are the building construction rates issued by the Department of Registration and Stamps, Government of Maharashtra.

5. No fee shall be levied for the building identified as Sub-Groups A-2 and A-4 below 15 meters occupancies as per Part 4 of the National Building Code of India, Part 4 and for all those buildings identified in section 15 of the Act.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

जा.क्र.का.15/वामूदत-2022-23/ 361
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नविन प्रशासकिय इमारत, तळमजला,पुणे-1
दि. 31 /03/2022

# आदेश

विषय :- सन 2022-23 साठी स्थावर मालमत्तेच्या वार्षिक मूल्य दर तक्त्यांना मंजुरी देणेबाबत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम, 1995 च्या नियम 4(3) अन्वये दरवर्षी एप्रिल महिन्याच्या 1 तारखेस महाराष्ट्र राज्यातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी स्थावर मालमत्तेचे वार्षिक मूल्यदर तक्ते प्रसिध्द करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी सन 2022-23 साठीचे वार्षिक मूल्यदर तक्ते सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तयार करुन मुख्य नियंत्रक महसुल प्राधिकारी यांचे मान्यतेकरिता उक्त नियम 4 च्या पोटनियम (1) अन्वये सादर केले आहेत;

त्याअर्थी उक्त नियमातील नियम क्र. 4 (3) अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, श्रावण हर्डीकर, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे याव्दारे सन 2022-23 या वर्षाकरिता महाराष्ट्र राज्यातील सर्व भौगोलिक क्षेत्राच्या स्थावर मालमत्तांच्या वार्षिक मूल्यदर तक्त्यांना मंजुरी प्रदान करीत आहे. सदर तक्ते दिनांक 01 एप्रिल 2022 पासुन अंमलात येतील.

सदरचे वार्षिक मूल्य दर तक्ते नोंदणी विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online services या सदराखाली eASR या ठिकाणी Process येथे उपलब्ध राहतील.

( श्रावण हर्डीकर )
मुख्य नियंत्रक महसुल प्राधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

1) मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग, मंत्रालय मुंबई - 32
2) मा. महालेखापाल, (लेखापरिक्षा)-II, नागपूर.

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी :-

1) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
2) वरिष्ठ तांत्रिक संचालक, एन.आय.सी. पुणे यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.
   सदर वार्षिक मूल्य दर तक्ते नोंदणी विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online services या सदराखाली eASR या ठिकाणी उपलब्ध करण्यात यावेत.
3) सहसंचालक, नगर रचना,मुल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
4) सह नोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे
5) उपसंचालक नगर रचना, मुंबई प्रदेश, मुल्यांकन, मुंबई
6) सहाय्यक संचालक नगर रचना, मूल्यांकन, पुणे/कोकण/नागपुर/नाशिक/औरंगाबाद/अमरावती.

7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (मुख्यालय) पुणे.

8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक) पुणे.
सदर आदेश या विभागाच्या संकेतस्थळावर Upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.

9) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, मुंबई/पुणे /कोकण /नागपुर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अमरावती.
सदर आदेश आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना तात्काळ अवगत करण्यात यावे. तसेच सदर आदेश त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & Acknowledge) त्यांचा कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

10) सहाय्यक संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-32.

11) प्रशासकीय अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक, मुंबई शहर / मुंबई उपनगर जिल्हा.

12) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी /सहजिल्हा निबंधक.
सह जिल्हा निबंधक यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व दुय्यम निबंधकांना सन 2022-23 च्या संबंधित वार्षिक मूल्यदर तक्त्याची प्रत पुरवावी व सदर आदेशाबाबत तात्काळ अवगत करावे.

परिशिष्ट 'ब'

**बृहन्मुंबई (मुंबई शहर व उपनगर जिल्हयातील) महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतींचे मुद्रांक शुल्क आकारणीकामी मूल्यांकनासाठी सन 2022-23 करिता वार्षिक मूल्य दर तक्त्यामध्ये बांधकाम वर्गीकरणानुसार नविन बांधकामाचे दर.**

**(जा.क्र. का.15/वामूदत-2022-23/361, दि. 31/3/2022 चे सहपत्र)**

| अ.क्र. | विभागाचे नांव | बांधकामाचा प्रकार | वा.मू.द.त. 2022-23 करिता विचारात घ्यावयाचे नविन बांधकामाचे प्रस्तावित दर- प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | मुंबई | **आर.सी.सी. बांधकाम-** आर.सी.सी. स्लॅब, विटांची /कॉंक्रीट भिंत, सिमेंट मॉर्टरमध्ये जुडाई, भितींना सिमेंट प्लॅस्टर, टाईल्स फ्लोअरिंग. | 30,250/- |
| | | **इतर पक्के बांधकाम -** लोड बेअरींग स्ट्रक्चर, आर.सी.सी. स्लॅब, विटांची भिंत, सिमेंट प्लॅस्टर, कच्चे किंवा सिमेंट फ्लोअरिंग. | 24,544/- |
| | | **अर्ध पक्के बांधकाम -** लोड बेअरिंग स्ट्रक्चर, मातीत बांधकाम केलेल्या दगडाच्या किंवा विटाच्या भिंती, शहाबादी फरशी / मातीचे फ्लोअरिंग वा इतर प्रकारचे फ्लोअरिंग, स्लॅब व्यतिरिक्त छप्पर. | 17,325/- |
| | | **कच्चे बांधकाम-** मातीमधील विटांच्या भिंती, मातीचा गिलावा, कौले / ॲस्बेटॉस वा टिनचे पत्रे असलेले छत. | 11,117/- |

**टिप :-**

1) आर.सी.सी. बांधकाम- फ्रेम स्ट्रक्चर-आर.सी.सी. स्लॅब, विटांची /कॉंक्रीट भिंत, सिमेंट मॉर्टरमध्ये जुडाई, भितींना आतून - बाहेरुन प्लॅस्टर, टाईल्स फ्लोअरिंग.
2) इतर पक्के बांधकाम - लोड बेअरींग स्ट्रक्चर, आर.सी.सी. स्लॅब, विटांची भिंत, आतून-बाहेरुन प्लॅस्टर, कच्चे किंवा सिमेंट फ्लोअरिंग.
3) अर्ध पक्के बांधकाम - लोड बेअरिंग स्ट्रक्चर, मातीत बांधकाम केलेल्या दगडाच्या किंवा विटाच्या भिंती, शहाबादी फरशी, मड फ्लोअरिंग किंवा इतर प्रकारचे फ्लोअरिंग, स्लॅब व्यतिरिक्त छप्पर.
4) 9.00 मी. पेक्षा कमी उंचीच्या इंडस्ट्रीयल शेडसाठी आर.सी.सी. बांधकाम दराच्या 75% दर विचारात घ्यावा व 9.00 मी. पेक्षा जास्त उंचीच्या इंडस्ट्रीयल शेडसाठी आर.सी.सी. बांधकाम दराच्या 100% दर विचारात घ्यावा.
5) जोता पातळीपर्यंतचे बांधकामासाठी उपरोक्त तक्त्यातील नवीन बांधकाम दराच्या 20% दर विचारात घ्यावा.
6) स्टील्ट पार्किंगचे स्लॅब पातळीपर्यंत उपरोक्त तक्त्यातील नवीन बांधकाम दराच्या 30% दर विचारात घ्यावा.

दि. 31/03/2022

31/3/2022.

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

परिशिष्ट 'ब'

महाराष्ट्रातील बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून उर्वरित क्षेत्रातील मिळकतींचे वार्षिक मूल्यदर तक्त्यानुसार सन 2022-23 करिता मुद्रांक शुल्क आकारणीकामी मूल्यांकनासाठी बांधकाम वर्गीकरणानुसार नविन बांधकामाचे दर.

(जा.क्र. का.15/वामूदत-2022-23/361, दि. 31/3/2022 चे सहपत्र)

| अ.क्र. | जिल्हा | बांधकामाचा प्रकार | वा.मू.द.त. 2022-23 करिता विचारात घ्यावयाचे नवीन बांधकामाचे प्रस्तावित दर प्रती चौ.मी. | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | आर.सी.सी. | इतर पक्के | अर्ध पक्के | कच्चे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1. | ठाणे | सर्व महानगरपालिका | 26,620 | 21,599 | 15,246 | 9,783 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 25,289 | 20,519 | 14,484 | 9,294 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 23,958 | 19,439 | 13,721 | 8,805 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 21,296 | 17,279 | 12,197 | 7,826 |
| 2. | पालघर | सर्व महानगरपालिका | 26,620 | 21,599 | 15,246 | 9,783 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 20,570 | 16,690 | 11,781 | 7,559 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,542 | 15,856 | 11,192 | 7,182 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 16,456 | 13,352 | 9,425 | 6,048 |
| 3. | रायगड | सर्व महानगरपालिका | 26,620 | 21,599 | 15,246 | 9,783 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 25,289 | 20,519 | 14,484 | 9,294 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 23,958 | 19,439 | 13,721 | 8,805 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 21,296 | 17,279 | 12,197 | 7,826 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4. | रत्नागिरी | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 20,570 | 16,690 | 11,781 | 7,559 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,542 | 15,856 | 11,192 | 6,801 |
| | | सर्व प्रभाग व ग्रामीण | 16,456 | 13,352 | 9,425 | 6,048 |
| 5. | सिंधुदुर्ग | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 19,360 | 15,708 | 11,088 | 7,115 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 18,392 | 14,957 | 10,534 | 6,759 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 15,488 | 12,566 | 8,870 | 5,692 |
| 6. | पुणे | सर्व महानगरपालिका | 26,620 | 21,599 | 15,246 | 9,783 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 25,289 | 20,519 | 14,484 | 9,294 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 23,958 | 19,439 | 13,721 | 8,805 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 21,296 | 17,279 | 12,197 | 7,826 |
| 7. | कोल्हापूर | सर्व महानगरपालिका | 24,200 | 19,635 | 13,860 | 8,894 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 22,990 | 18,653 | 13,167 | 8,449 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 21,780 | 17,672 | 12,474 | 8,004 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 19,360 | 15,708 | 11,088 | 7,115 |
| 8. | सोलापूर | सर्व महानगरपालिका | 21,780 | 17,672 | 12,474 | 8,004 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 20,691 | 16,788 | 11,850 | 7,604 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,602 | 15,904 | 11,227 | 7,204 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 17,424 | 14,137 | 9,979 | 6,403 |
| 9. | सांगली | सर्व महानगरपालिका | 22,990 | 18,653 | 13,167 | 8,449 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 21,841 | 17,721 | 12,509 | 8,026 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व | 20,691 | 16,788 | 11,850 | 7,604 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 15. | नंदुरबार | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 19,360 | 15,708 | 11,088 | 7,115 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 18,392 | 14,923 | 10,534 | 6,759 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 15,488 | 12,566 | 8,870 | 5,692 |
| 16. | औरंगाबाद | सर्व महानगरपालिका | 24,200 | 19,635 | 13,860 | 8,894 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 22,990 | 18,653 | 13,167 | 8,449 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 21,780 | 17,672 | 12,566 | 8,004 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 19,360 | 15,708 | 11,088 | 7,115 |
| 17. | जालना | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 20,570 | 16,690 | 11,781 | 7,559 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,542 | 15,856 | 11,192 | 7,182 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 16,456 | 13,352 | 9,425 | 6,048 |
| 18. | नांदेड | सर्व महानगरपालिका | 21,780 | 17,672 | 12,474 | 8,004 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 20,691 | 16,788 | 11,850 | 7,604 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,602 | 15,904 | 11,227 | 7,204 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 17,424 | 14,137 | 9,979 | 6,403 |
| 19. | परभणी | सर्व महानगरपालिका | 21,780 | 17,672 | 12,474 | 8,004 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 20,691 | 16,788 | 11,850 | 7,604 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,602 | 15,708 | 11,227 | 7,204 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 17,424 | 14,923 | 9,979 | 6,403 |
| 20. | हिंगोली | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 18,150 | 12,566 | 10,395 | 6,670 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व | 17,243 | 13,991 | 9,875 | 6,337 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | विशेष नियोजन प्राधिकरण | | | | |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 18,392 | 14,923 | 10,534 | 6,759 |
| 10. | सातारा | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 20,570 | 16,690 | 11,781 | 7,559 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,542 | 15,856 | 11,192 | 7,182 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 16,456 | 13,352 | 9,425 | 6,048 |
| 11. | नाशिक | सर्व महानगरपालिका | 24,200 | 19,635 | 13,860 | 8,894 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 22,990 | 18,653 | 13,167 | 8,449 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 21,780 | 17,672 | 12,474 | 8,004 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 19,360 | 15,708 | 11,088 | 7,115 |
| 12. | धुळे | सर्व महानगरपालिका | 21,780 | 17,672 | 12,474 | 8,004 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 20,691 | 16,788 | 11,850 | 7,604 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,602 | 15,904 | 11,227 | 7,204 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 17,424 | 14,137 | 9,979 | 6,403 |
| 13. | अहमदनगर | सर्व महानगरपालिका | 21,780 | 17,672 | 12,474 | 8,004 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 20,691 | 16,788 | 11,850 | 7,604 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,602 | 15,904 | 11,227 | 7,204 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 17,424 | 14,137 | 9,979 | 6,403 |
| 14. | जळगांव | सर्व महानगरपालिका | 22,990 | 18,653 | 13,167 | 8,449 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 21,841 | 17,721 | 12,509 | 8,027 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 20,691 | 16,788 | 11,850 | 7,604 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 18,392 | 14,923 | 10,534 | 6,759 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | विशेष नियोजन प्राधिकरण | | | | |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 14,520 | 11,781 | 8,316 | 5,336 |
| 21. | उस्मानाबाद | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 18,150 | 14,726 | 10,395 | 6,670 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 17,243 | 13,991 | 9,875 | 6,337 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 14,520 | 11,781 | 8,316 | 5,336 |
| 22. | लातुर | सर्व महानगरपालिका | 21,780 | 17,672 | 12,474 | 8,004 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 20,691 | 16,788 | 11,850 | 7,604 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,602 | 15,904 | 11,227 | 7,204 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 17,424 | 14,137 | 9,979 | 6,403 |
| 23. | बीड | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 19,360 | 15,708 | 11,088 | 7,115 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 18,392 | 14,923 | 10,534 | 6,759 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 15,488 | 12,566 | 8,870 | 5,692 |
| 24. | अमरावती | सर्व महानगरपालिका | 22,990 | 18,653 | 13,167 | 8,449 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 21,841 | 17,721 | 12,509 | 8,026 |
| | | सर्व 'ब' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 20,691 | 16,788 | 11,850 | 7,604 |
| | | सर्व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,542 | 15,856 | 11,192 | 7,182 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 18,392 | 14,923 | 10,534 | 6,759 |
| 25. | अकोला | सर्व महानगरपालिका | 21,780 | 17,672 | 12,474 | 8,004 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 20,691 | 16,788 | 11,850 | 7,604 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,602 | 15,904 | 11,227 | 7,204 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 17,424 | 14,137 | 9,979 | 6,403 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 26. | वाशिम | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 18,150 | 14,726 | 10,395 | 6,670 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 17,243 | 13,991 | 9,875 | 6,337 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 14,520 | 11,781 | 8,316 | 5,336 |
| 27. | बुलढाणा | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 18,150 | 14,726 | 10,395 | 6,670 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 17,243 | 13,991 | 9,875 | 6,337 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 14,520 | 11,781 | 8,316 | 5,336 |
| 28. | यवतमाळ | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 19,360 | 15,708 | 11,088 | 7,115 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 18,392 | 14,923 | 10,534 | 6,759 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 15,488 | 12,566 | 8,870 | 5,692 |
| 29. | नागपूर | सर्व महानगरपालिका | 26,620 | 21,599 | 15,246 | 9,783 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 25,289 | 20,519 | 14,484 | 9,294 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 23,958 | 19,439 | 13,721 | 8,805 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 21,296 | 17,279 | 12,197 | 7,826 |
| 30. | वर्धा | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 19,360 | 15,708 | 11,088 | 7,115 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 18,392 | 14,923 | 10,534 | 6,759 |
| | | सर्व प्रभाग व ग्रामीण | 15,488 | 12,566 | 8,870 | 5,692 |
| 31. | चंद्रपूर | सर्व महानगरपालिका | 21,780 | 17,672 | 12,474 | 8,004 |
| | | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 20,691 | 16,788 | 11,850 | 7,604 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 19,602 | 15,904 | 11,227 | 7,204 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 17,424 | 14,137 | 9,979 | 6,403 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 32. | भंडारा | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 18,150 | 14,726 | 10,395 | 6,670 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 17,243 | 13,991 | 9,875 | 6,337 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 14,520 | 11,781 | 8,316 | 5,336 |
| 33. | गोंदिया | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 19,360 | 15,708 | 11,088 | 7,115 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 18,392 | 14,923 | 10,534 | 6,759 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 15,488 | 12,566 | 8,870 | 5,692 |
| 34. | गडचिरोली | सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदा | 16,940 | 13,745 | 9,702 | 6,225 |
| | | सर्व 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा / नगरपंचायती व विशेष नियोजन प्राधिकरण | 16,093 | 13,057 | 9,217 | 5,914 |
| | | सर्व प्रभाव व ग्रामीण | 13,552 | 10,996 | 7,762 | 4,980 |

**टिप :-**

1) आर.सी.सी. बांधकाम- फ्रेम स्ट्रक्चरआर.सी.सी. स्लॅब,विटांची /कॉंक्रीट भिंत, सिमेंट मॉर्टरमध्ये जुडाई, भिंतींना आतून - बाहेरुन प्लॅस्टर, टाईल्स फ्लोअरिंग.
2) इतर पक्के बांधकाम-लोड बेअरींग स्ट्रक्चर, आर.सी.सी. स्लॅब, विटांची भिंत, आतून-बाहेरुन प्लॅस्टर, कच्चे किंवा सिमेंट फ्लोअरिंग.
3) अर्ध पक्के बांधकाम- लोड बेअरिंग स्ट्रक्चर, मातीत बांधकाम केलेल्या दगडाच्या किंवा विटाच्या भिंती, शहाबादी फरशी, मड फ्लोअरिंग किंवा इतर प्रकारचे फ्लोअरिंग, स्लॅब व्यतिरिक्त छप्पर.
4) 9.00 मी. पेक्षा कमी उंचीच्या इंडस्ट्रीयल शेडसाठी आर.सी.सी. बांधकाम दराच्या 75% दर विचारात घ्यावा व 9.00 मी. पेक्षा जास्त उंचीच्या इंडस्ट्रीयल शेडसाठी आर.सी.सी. बांधकाम दराच्या 100% दर विचारात घ्यावा.
5) जोता पातळीपर्यंतचे बांधकामासाठी उपरोक्त तक्त्यातील नवीन बांधकाम दराच्या 20% दर विचारात घ्यावा.
6) स्टील्ट पार्किंगचे स्लॅब पातळीपर्यंत उपरोक्त तक्त्यातील नवीन बांधकाम दराच्या 30% दर विचारात घ्यावा.

दि. 31/3/2021

31/3/2022

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**